(40)

दिनांक २९ . ०९ . २०२३

प्रति ,

सन्माननीय श्री निलेश लंके साहेब पारनेर - नगर विधानसभा सदस्य

यांचे सेवेशी

विषय : गांजीभोयरे (वाडावस्ती )येथे सीडी वर्क पूलाचे कामास मंजुरी मिळणे बाबत ...

महोदय ,

उपरोक्त विषयान्वये सौ. अनिता नारायण बाचकर मा . सरपंच ग्रा. पं .गांजीभोयरे यांचेकडून आपणांस नम्र विनंती करण्यात येते की दिनांक 29 / 9 / 2023 रोजी झालेल्या पावसामुळे (ढगफुटी) मुळे सिद्धेश्वर ओढ्या वरील वाडावस्ती येथील रस्ता वाहून गेला आहे . त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांस शाळेत जाण्यास अडचणी निर्माण होत आहेत . पर्यायी रस्ता नसल्याने त्यांना शाळेत जाता येत नाही .

तसेच वस्तीवरील शेतकरी , मजूर यांना शेतीच्या कामासाठी रस्ता नाही . तरी कृपया वाडावस्ती या ठिकाणी सी डी वर्क पूलाचे काम मंजूर केल्यास हा प्रश्न कायमचा सुटेल . तरी सदरचे काम लवकर मंजूर करावे ही आपणांस सर्व ग्रामस्थांच्या वतीने नम्र विनंती .

कळावे ,

NBachkar

सौ . अनिता नारायण बाचकर

मा .आदर्श सरपंच गांजीभोयरे



